
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi




Ajanta Prakashan

# १०. गौतम बुद्धांचे पर्यावरण विषयक विचार

**प्रा. कांबळे दयानंद सखाराम**
भूगोल विभाग, जवाहर कला विज्ञान व वाणिजय महाविद्यालय, अणदूर.

**" तीर, तलवार-बारूद क्यो बनाता हे आदमी चाकू,**
**छुरी खंजर-कु-हाडी से प्रकृतिको क्यो तोडता है, छेडता है आदमी ! "**

सृष्टीच्या निर्मितीपासून सर्वांना कुतूहलचा विषय ठरत असलेल्या पृथ्वीब÷ल आजही म्हणावे तेवढे संशोधन झाले नाही मानव प्राण्याला निसर्गाने ज्या गोष्टी निर्माण करून दिल्या आहेत. त्याचा गैरवापर मानवाकडून मोठया प्रमाणात होत आहे. पृथ्वीवर यामुळे अनेक प्रकारची संकटे निर्माण होत आहेत जर यावर योग्य वेळेत नियंत्रण झाले नाहीत तर काही वर्षात मानव आणि पर्यावरण यांचा संबंध बिघडून त्याचा संबंध मानव जातीवर विपरीत परिणाम होईल यात मुळीच शका नाही. आज मानवाची स्थिती मृगजळाचा पाठलाग करणा-या हरिणासारखी झाली आहे. स्वतःच्या स्वार्थी अभिलाषापोठी मानव आज निसर्गावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत आहे. सृष्टीमध्ये पृथ्वी हा एकमेव गृह मानवासाठी अनुकूल घटक निर्माण करून देत आहे. पण मानवास आज पर्यंत याची ओळख नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मानवाचे अस्तित्व लवकरच धोक्या येण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी 33 % वन असणे आवश्यक आहे. परंतू मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. त्यामुळे मानवी जीवन दुःखमय होत आहे. दुःखाची निर्मिती तृष्णा या घटकामुळे होते. तृष्णा मिटविल्यास दुःख नष्ट करून सुखी व निरागस जीवन प्राप्त करता घेऊ शकते. जीवन सुखी व तृष्णा मुक्त करणे हा बुध्दाचा मुळ उ÷श आहे. जगाची पुर्नरचना सूखी व समृध्द करण्यासाठी पर्यावरण प्रदुषण मुक्त करणे ही व्यापक संकल्पना बुध्दाच्या विचाराचा प्रमुख सार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी तथागत गौतम बुध्दाच्या विचारांचे चिंतन करणे हा प्रस्तुत शोध निबंधाचा प्रमुख उ÷श आहे. जगामध्ये सर्वाधिक अनुयायी असलेले सर्वाधिक अनुयायी असलेले सर्वाधिक प्रभावशाली बौध्द धर्माचे संस्थापक होते. मागील दहा हजार वर्षामध्ये ज्यांनी आपली बुध्दिमता वापरून

मानवी कल्याणासाठी जे महान कार्य केले अशा जगातील टॉप 100 विश्वमानवाची यादी इंग्लंडमधील ऑक्सफोर्ड विद्यापीठाने तयार केली त्यात तथागत भगवान गौतम बुध्दाचे नाव प्रथम स्थानी होते हे भारतीयासाठी गौरवाची बाब आहे.

**आचार्य रजनीश [ओशो] गौतम बुध्दा विषयी असे म्हणतात की, बुध्दानंतर त्यांच्या जवळपास जाऊ शकेल असा महामानव भारताने किंवा जगाने आजपर्यंत निर्माण केला नाही.**

गौतम बुध्दांचा जन्म नेपाळमधील लुबिनी वनात इ. स. पू 563 मध्ये झाला. त्यांच्या पित्याचे नाव शुद्धोदन आणि आईचे नाव मायादेवी होते. गौतमबुध्दाचे मुळ नाव सिदधार्थ होते. शुदधोदन हा त्याकाळच्या शाम्य नामक क्षत्रिय वंशाचा प्रमुख असून कपिल वस्तू हे त्यांच्या राजधानीचे नाव होते.





शाक्य वंशानी बसविलेला प्राप्त कोसल देशात 'राप्ती नदीच्या उत्तरभागी असून नेपाळ या देशातून गेलेल्या हिमालय पर्वताच्या पायथ्यापर्यंत पसरला आहे. या प्रांताच्या पूर्वेस रोहिनी नदी नदीच्या पलीकडे शाभ्यांचा ताबा नव्हता शाक्याचा हा प्रांत बराच सपाट असून सूपीक होता. हिमालयावरून वाहत येणा-या लहान-लहान नाल्याचे पाणी येथे जमा होऊन ते पाणी जमिनीत मुरत असे त्यामुळे त्याठिकाणची शेत जमिन भात पिकासाठी उपयुक्त आहे.

शाक्यांच्या या प्रांतात आंब्याची व चिंचेची पुष्कळ झाडे असून जिकडे तिकडे झुळझुळ वाहणारे पुष्कळ नाले आहेत. त्यामुळे तो प्रांत फारच रमणीय झालेला दिसून येतो. त्याशिवाय हिमालयाची नेपाळी रांग एकसारखी उंचच उंच लागून राहिल्यामुळे तर तेथील देखावा फारच भव्य दिसतो.

गौतमबुध्दाची मात तो जन्मंल्यावर सातव्या दिवशी मरण पावली ही माऊली परम रूपवती होती. ती मरण पावल्यानंतर तिची बहिण , महाप्रजापती हिने गौतमाचे संगोपन स्वपुत्राप्रमाणे केले. गौतमबुध्द लहान पणापासूनच अतिशय बुध्दिमान असल्यामुळे त्याना कोणतीही गोष्ट दोन वेळा सांगावी लागत नसे. त्या काळच्या राजपुत्रास ज्या विद्या व कला शिकवण्याचा परिपाठ असे त्या सा-या तो अल्पवयातच शिकून तयार झाला.

एक समयी तो आपल्या सोबत्यासह वर्तमान एक शेत पाहण्यासाठी नगरापासून अंमळ दूर गेला. त्यावेळी त्यांच्या नजरेस ज्या गोष्टी घडल्या त्यामुळे त्याच्या चिन्तास परम उद्विग्नता प्राप्त झाली. प्रथमतः त्याने त्या शेतात दिवसभर राबणा-या शेतक-याची स्थिती पाहिली गरीब दीनजनांनी उन वारा पाऊस याची पर्वा न करता अहर्निश जिवापाड श्रम करावे आणि राजांनी व सरदारांनी स्वस्थ घरी बसून या कंगाल लोकाकडून करानिमित्त घेतलेल्या धनावर चैन करावी हे काही बरे नव्हे. हा निव्वळ अन्याय आहे. तसेच त्या मुक्या जनावरांनी शेतक-यांच्या आसुडांचे तडाखे बसतील या भीतीने अंगात ताकत नसातानाही

नांगर ओढावे आणि त्यांच्या मानेला मोठमोठया जखमा पडल्या तरी त्याब÷ल कोणास काहीच नाही हा केवढा निर्दयपणा.

पशुपक्षाकडे निरनिराळे व्यापार अवलोकन करीत असता त्याच्या दृष्टीस जरी वरवरून मोठी मनोरम वनश्री पडली तरी अंमळ खोल विचार करून जेव्हा त्याने आपल्या मनात त्या वनातील प्राण्यांची वास्तविक स्थिती आणली तेव्हा त्याला असे भासले की, ते प्राणी सुखदर्शनी दिसतात तेवढे सुखी नाहीत. त्याला विपत्ती व संकटे यांचा सदा अनुभव घडत असतो. त्यांच्या दृष्टीस असे पडले की पाली मुंग्या खाऊन उपजीविका करतात. या पाली सर्पाच्या भक्ष्यस्थानी पडतात आणि गरूड तर या दोन्ही जातीचे प्राणी खाऊन निर्वाह करीत असतात. त्याचप्रमाणे बुलबुलपक्षी पतंगावर झेप घालण्यास सर्वदा टपलेले असतात आणि या बुलबुल पक्ष्यांच्या , पाठीस बहिरी ससाणा लागलेला असतो. या प्रमाणे चोहेकडे ' जीवोजीवस्य जीवन ' अशी स्थिती त्यांच्या अवलोकनात आली.

एके प्रसंगी तो बागेत बसला असता त्याच्यावरती अंतराळातून उडत जाण-या एका हंसास त्याचा चुलतभाऊ देवदत्त याने बाण मारला. त्या सरशी तो पक्षी त्यांच्यापुढे मृतवत होऊन पडला. तो पक्षी रक्ताने भरलेला असून तो धडपडत आहे असे पाहून तो तात्काळ उठला आणि त्या पक्ष्याकडे जाऊन त्याला वर उचलून त्याची अशी अवस्था कशामुळे झाली ते तो पाहू

लागला. तेव्हा त्याला असे दिसून आले की, त्या पक्ष्याला कोणाचा बाण लागून मोठी जखम झाली आहे. मग त्या बिचा-या प्राण्याला मोठया ममतेने एका हातात धरून दुस-या हाताने त्याच्या अंगात शिरलेला तो बाण त्याने काढला आणि त्याच्या जखमेत काही औषध भरून त्याला हिरव्यागार पानांमध्ये लपेटून ठेवले. त्या पक्ष्यास उपचार करीत असता त्याच्या हातास त्या बाणाचे टोक बोचले. त्या सरशी त्याला पुष्कळ वेदना झाली. इतक्यात कोणी त्यांच्याजवळ येऊन म्हटले की, आमच्या छोटे महाराजांनी या पक्ष्याला बाण मारून खाली पाडले आहे, तरी आपण त्यला माझ्या स्वाधीन करावे. त्यावर सिध्दार्थ म्हणाला नाही तो मी तुझ्या स्वाधीन करीत नाही. हा पक्षी जीवंत आहे. हा पक्षी माझा आहे. यावर मी दया करून याचा जीव वाचविला आहे. हिंसा करणारा जीवाची हानी करितो आणि रक्षण करणारा त्यांचे परिपालन करतो. यावरून या पक्ष्यांचा जीव ज्याने वाचविला त्यास हा पक्षी मिळणे रास्त आहे.

तथागत गौतमबुद्धाला मानवी जीवनाचे संपूर्ण ज्ञान प्राप्त झाले होते. म्हणून त्याना ' बुध्द ' असे म्हटले गेले. मानवी जीवनात दुःख का आहे. हा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला. एका वैशाख पोर्णिमेला बिहारमधील गया शहरापासून जवळच असलेल्या ऊरूवेला या ठिकाणी एका पिंपळाच्या झाडाखाली ते ध्यानस्थ बसले होते. त्या वेळी त्यांना ' बोधि ' प्राप्त झाली . 'बोधि म्हणजे सर्वोच्च ज्ञान ' त्या पिंपळाच्या वृक्षाला आता 'बोधिवृक्ष ' असे म्हणतात. तसेच 'ऊरूवेला ' या

स्थानाला 'बोधगया' असे म्हणतात. त्यांनी त्यांचे पहिले प्रवचन वाराणसी जवळ सारनाथ येथे दिले. या प्रवचनात त्यांनी जो उपदेश केला त्यास ' धम्म' असे म्हणतात.

धम्माचा उपदेश करण्यासाठी सुमारे पंचेचाळीस वर्षे चारिका केली. त्यानी आपला उपदेश पाली भाषेत केला. भगवान गौतम बुध्द उपदेश देण्याकरिता आनंद सोबत एका गावात चालले होते. रस्त्यात त्यांनी एक छोटी नदी ओलांडली आणि पुढे गेले. कडकडीत उन पडले होते. थोडया वेळानंतर बुध्दांना तहान लागली. ते एका वृक्षाखाली बसले आणि आनंदला नदीतून पाणी आणायला सांगितले. तो नदीपर्यत पोंहचला पण पाणी गढूळ होते. ते पिण्या योग्य नाही. तो परत आला आणि बुध्दांना सांगितले की पाणी स्वच्छ नाही. मग भगवान म्हणाले परत जा आणि पाणी स्वच्छ होईपर्यंत प्रतिक्षा कर. आनंद परत गेला. तो पर्यंत माती खाली तळाला गेली होती. पण पाणी अजून अस्वच्छ होते. काही करण्यासाठी नव्हते म्हणून आनंद नदीकडे ध्यानस्त बसला. थोडया वेळानंतर त्याने डोळे उघडले तर काय बघतो की पाणी अगदी

स्वच्छ झालेले होते. माती पूर्णपणे तळाला गेली होती . आमच्या मनाचेही तसेच आहे. अशी माती पाण्याला घाण करते. तसेच आमचे विचार आमच्या चेतनेला गढूळ करतात. त्याक्षणी आम्ही विचाराकडे लक्ष देत नाही. त्याना महत्व देत नाही. आमच्या अंतर्मनात मौन उतरायला लागते. आम्हला चेतनेची शुध्द स्थिती प्राप्त होते. यालाच ध्यान म्हणतात. तथागत गौतमबुध्द म्हणतात की " **आप तब तक रास्ते पर नही चल सकते जब तक आप खुद अपना रास्ता नही बना लेते !**"

बौध्द धम्मामध्ये बुद्ध . धम्म आणि संघ यांना शरण जाण्याची संकल्पना महत्वाची आहे. या संकल्पनेला 'त्रिशरण ' असे म्हणतात. त्यांनी सांगितलेल्या धम्माचे सार आर्य सत्य, पंचशील आणि अष्टांगिक मार्ग पंचशील हे आहेत . आपल्या





धम्माचा उपदेश करण्यासाठी त्यांनी भिक्खूंचा व भिक्खुनीचा संघ तयार केला. बौध्द धर्मात सर्व वर्णातील व जाती जमाती मधील लोकांना प्रवेश होता.

गौतम बुध्दांनी मानवी बुद्धीच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. वर्ण वगैरेंच्या आधारे मानली जाणारी विषमता नाकारली. जन्माने कोणी श्रेष्ठ व कनिष्ठ ठरत नाही. तर आचरणावरूनच श्रेष्ठ कनिष्ठता ठरते. ' छोटीशी चिमणी देखील आपल्या घरटयात स्वच्छंदपणे चिवचिवते ' हे त्यांचे वचन विख्यात आहे. ते स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांविषयींचे त्यांचे चिंतन दर्शवते. त्यांनी पुरूषाप्रमाणे स्त्रियांनाही स्वतःची उन्नती करण्याचा अधिकार आहे. असा उपदेश केला. यज्ञासारख्या कर्मकांडाला विरोध केला. त्यांनी उपदेशलेली प्रज्ञा, शील इत्यादी. मूल्ये मानवाचे कल्याण साधणारी आहेत. सर्व प्रणिमात्रां विषयींची 'करूणा ' हे त्याच्या व्यक्तिमत्वाचे असाधारण वैशिष्टय होते.

गौतमबुध्दांनी उपदेशलेली सहिष्णुता केवळ भारतीय समाजालाच नव्हे तर सर्व मानवजातीला आजही मार्गदर्शक आहे.

**" मै इंसानियत में बसता हूँ और लोग मुझे मजहबोंमे ढूँढते है "।**

बुध्दांनी आपल्या आयुष्यात आपल्या वचानात वृक्षांना वनस्पतीना फार महत्व दिले आहे. वयाच्या 29 व्या वर्षानंतर म्हणजेच गृह त्यागानंतर आपले संबंध आयुष्य त्यानी निसर्गाच्या सानिध्यात व्यतीत केलेले दिसते.

बुध्दाच्या आयुष्यात घडलेल्या अनेक महत्वपूर्ण घटना जसे की जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाहन हे अनुक्रमे साल, पिंपळ, चिंच , जांभूळ शालू वृक्षाखालीच झालेले पहावयास मिळतात. ज्ञानप्राप्तीनंतर सुध्दा बुध्दाने एक एक आठवडा या वृक्षाखाली व्यतीत केलेले आपणास दिसून येते. पाली वङःमयात बुध्दांना अनेक श्रेष्ठी व राजांनी वने दान केलेली आपणास दिसून येते. जसे की जेतवन, महावन, न्यग्रोधवन, आम्रवन, अम्बपाली, वन तथागताच्या अनेक प्रवचनात तसेच जातक कथेत आपणाला वृक्षाचे महत्व व उपयोग सापडतात. तथागतांनी वृक्षाच्या संगोपनासाठी व त्यांचा मानवाला किती कसा उपयोग होऊ शकतो याचे काही नियम सांगितले आहोत ते आपणाला पाली " विनय पिटकात " सापडतात.

सर जगदिशचंद्र बोस यांनी 19 व्या शतकता पॅरिसच्या परिषदेत वनस्पतीना जीव असतो हे प्रयोगा द्वारे सिध्द केले परंतू तथागतानी 2500 वर्षापूर्वी वनस्पतीना जीव असतो हे सिध्द केले होते. तथागतांनी वृक्षाच्या संरक्षणासाठी जे नियम केले होते. यावरून त्यांची दूरदृष्टी व आजच्या औद्योगिकरणाच्या व शहरीकरणाच्या काळात त्याचे उपयोग व महत्व कळते म्हणून तथागत भगवान गौतम बुध्दाचे पर्यावरण विषयक विचार किती महान होते.

" भर नही जो भावोंसे, बहते जिस में रसधार नाही ह्रदय नही, वह पत्थर है, जिसमें पर्यावरण के प्रति प्यार नही "

पर्यावरणा नैसर्गिक साधन संपत्ती मुबलक प्रमाणात आहे. तिचा काळजीपूर्वक व जपून वापर करणे आवश्यक आहे परंतू काही साधन सपत्ती मानवाला पुन्हा निर्माण करता येऊ शकत नाही.

आज जगातील काही राष्ट्राकडे अशा प्रकारचे अनुबॉंब आहेत की त्याच्या एका अंशानेही संपूर्ण पृथ्वीचा विनाश होऊ शको. त्यासाठी राष्ट्रा राष्ट्रात मैत्री, प्रेम, करूणा निर्माण होणे गरजेचे आहे. गौतम बुद्धांनी उपदेशलेली सहिष्णुता केवळ भारत भुमीमधीलाच नव्हे तर संपूर्ण जगातील मानव जातीला आजही मार्गदर्शक आहे.

या माणूसकीला का

संदर्भ ग्रंथ

1) पर्यावरण शास्त्र - प्रा.डॉ.आर.आर.पाटील

2) पर्यावरण विज्ञान - प्रा.डॉ.प्रकाश सावंत

3) गौतमबुध्दाचे चरित्र - कृष्णराव अर्जून केळूसकर साकेत प्रकाशन , औरंगाबाद

4) भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म - डॉ.बी.आर. आंबेडकर सिध्दार्थ प्रकाशन, मुंबई

5) सर्वोतम भूमिपुत्र गौतमबुध्द - डॉ.आ.ह.साळुंखे

6) इतिहास व नागरिक शास्त्र - डॉ.शुभांगना अत्रे , कुलकर्णी , प्रकाशक विवेक उत्तम गोसावी.

7) www.google.com

. आपल्या